# • भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना •

राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांना / गावांना पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सन 1974 पासुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती सुधारणा योजना (पुर्वीची दलित वस्ती सुधार योजना) राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यामध्ये नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा / गावांचा कमी अधिक प्रमाणात विकास झाला तरी या एकसमान झालेला दिसुन येत नाही. राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागातील विशेष घटक संवर्गातील वस्त्यांमध्ये / गावांमध्ये विकास कामे निधी अभावाने प्रलंबित राहिल्याने ग्रामस्थांना तसेच नागरी भागातील रहिवाशांना अनेक समस्यांना तोड द्यावे लागते. यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडुन अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीस/गावाच्या विकास कामांकरीता वारंवार मोठया प्रमाणात निधीची मागणी होत असल्याने सदर बाब विचारात घेवुन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती / गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देण्यासंदर्भात नव्याने राज्यस्तर योजना तयार करुन सदर योजनेचे निकष निश्चित करणे आवश्यक होते. तसेच या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करुन सदर योजना राबविण्यात येत आहे.

राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देवुन या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करण्यासाठी “भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना” अशी राज्यस्तर योजना शासन निर्णय क्र.दवसु-2015/प्र.क्र.347/अजाक, दि.9.3.2018 अन्वये सन 2018-19 या वर्षापासुन राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या योजनेकरीता लोकप्रतिनिधी म्हणुन केवळ विद्यमान खासदार व आमदार यांच्याच प्रस्तावाचा विचार केला जातो.

## योजनेचे स्वरुप:

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती सुधार योजनेंतगात निधी प्राप्त होवुनही पुरेशा निधीअभावी गावांतील/ वस्त्यांमध्ये विकास कामे पुरेशा प्रमाणात झालेली नाहीत अशा भागातील लोकप्रतिनिधींना त्यांनी मागणी केल्याप्रमाणे ग्रामविकास, अल्पसंख्यांक आणि नगर विकास विभागाच्या धर्तीवर शासन स्तरावरुन थेट निधी उपलब्ध करुन देण्याची राज्यस्तर योजना आहे.**

## योजनेमध्ये घ्यावयाची कामे:

**सदर योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील / गावातील पाणी पुरवठा, मलनि:सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटार बांधणे, स्मशानभुमीचा विकास करणे, पथदिवे, पर्जन्य पाण्याचा निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालये, ग्रंथालय/ अभ्याससिका, व्यायाम शाळा या व्यतिरिक्त स्थानिक वस्तीतील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेता विकास कामांचा समावेश शासन स्तरावरुन करण्यात येईल.**

## संपर्क :

- **सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, भंडारा**
- **गट विकास अधिकारी, पंचायत समिती**